# प्रेसनोट

नाशिक,

दिनांक : २०/०८/२०१८

**आलोसे घन:शाम हरी भुसारे, तलाठी गंगापूर, ता.जि.नाशिक यांना ३,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नांवे गोवर्धन गांवातील गट नं.८८ क्षेत्र ७.३० आर असलेल्या शेतजमिनीमध्ये सुमारे २ वर्षापुर्वी आंबा, पपई, पेरु, व नारळ या झाडांची लागवड केलेली असून सदर लागवडी प्रमाणे शेतजमिनीचे ७/१२ उता—यावर पिकपेरा लावण्यासाठी तक्रारदार यांनी वडीलांचे नांवे केलेल्या अर्जावरुन शेतजमिनीचे ७/१२ उता—यावर पिकपेरा नोंद करणेकरीता आलोसे घन:शाम हरी भुसारे, तलाठी, गंगापूर, ता.जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ४,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक २०/०८/२०१८ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने सापळा आयोजित करुन पडताळणी केली असता आलोसे घन:शाम हरी भुसारे, तलाठी गंगापूर, ता.जि.नाशिक यांनी शेतीचे ७/१२ उता—यावर पिकपेरा नोंद करणेकरीता तक्रारदार यांचेकडे ४,०००/— रूपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम गोवर्धन, ग्रामपंचायत कार्यालयाचे इमारती मधील गंगापुर तलाठी कार्यालयामध्ये स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

**( हेमंत सोमवंशी )**
पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता